C.1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

**जा.क्र.मनपा/आस्था/** ५९६ **/2022-23** **दि.** १४ /०६ **/2022**

**परिपत्रक**

विषय :- स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग, नवी मुंबई
व
महालेखाकार, मुंबई यांचेकडील आक्षेपांचे अनुपालन पडताळणी करणेसाठी शिबीर आयोजित करणेबाबत.

आपल्या महानगरपालिकेच्या प्रलंबीत आक्षेपांचे अनुपालन पडताळणी करणेकरीता स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने दि.21/10/2021 रोजी शिबीर आयोजित करुन त्यात एकुण 110 परिच्छेद वगळले. त्यानंतर दि.24/03/2022 रोजी शिबीर आयोजित करुन त्यात एकुण 68 परिच्छेद वगळण्यात आले आहेत. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडे महाराष्ट्रातल्या एकुण 27 महानगरपालिकेचे लेखापरीक्षण व अनुपालन पडताळणीचे काम आहे. त्यामुळे त्यांचे कार्यालयाकडून एकाच महानगरपालिकेसाठी वारंवार शिबीर आयोजित करण्याचे काम केले जाणार नाही. तथापि, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या काही विभागाने आपले अनुपालन दाखविले असुन आक्षेप वगळुन घेतले आहेत. परंतू काही विभागाने कोणतीच कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. लेखापरिक्षणाच्या प्रलंबीत आक्षेपाबाबत मा. आयुक्त कार्यालयात प्रत्येक महिन्याच्या मासिक सभेत आढावा घेण्यात येतो. परंतू अद्यापही महानगरपालिकेच्या प्रलंबीत आक्षेपाची स्थिती पुढीलप्रमाणे असल्याचे दिसुन येते.

| विभागाचे नाव | प्रलंबीत परिच्छेद | पुर्तता केलेले परिच्छेद | शिल्लक प्रलंबीत परिच्छेद |
|---|---|---|---|
| स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग | 227 | 59 | 168 |
| महालेखाकार | 119 | 07 | 112 |
| मुख्यलेखापरीक्षक | 1010 | - | 1010 |
| **एकुण** | **1356** | **66** | **1290** |

प्रलंबीत आक्षेपांची वेळीच पुर्तता होत नाही. याबाबत नगर विकास विभाग, मंत्रालय, विभागीय आयुक्त कोकण भवन यांचेकडून वारंवार विचारणा केली जाते. महानगरपालिकेच्या अन्य कामकाजाच्या बाबतीत आपण कितीही प्रगती केली असली तरी प्रलंबीत आक्षेपामुळे महानगरपालिकेला कमी गुण प्राप्त होतात. ही बाब शोभनिय नाही. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग पुढील काळात पडताळणी शिबीर ठेवण्यास असमर्थ होते. म्हणुन मा. आयुक्त महोदय यांनी दि.11/05/2022 रोजी मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग, नवी मुंबई यांचे सोबत दुरध्वनीव्दारे विनंती केल्याने त्यांचेकडून अजुन एक (तिसरे) पडताळणी शिबीराचे आयोजन माहे जून 2022 च्या दुसऱ्या पंधरवडयात आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व विभागप्रमुख व संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी आपल्या

विभागाचे सर्व प्रलंबीत आक्षेपांची त्वरीत पुर्तता करुन ते विभागाच्या उप-आयुक्त यांचेमार्फत मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीकरीता पाठविण्याचे काम जून-2022 च्या पहिल्या पंधरवडयात करावयाचे आहे. सदरची पुर्तता करताना काही अडचणी आल्यास आस्थापना विभागात असलेले लेखापरीक्षा अधिकारी (श्री. वैवुडे) सेवाकरार यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील काम करावे. आपणाकडून सदरचे काम विहित वेळेत झाले नाहीत, तर पुन्हा या वित्तीय वर्षात पडताळणी शिबीराचे आयोजन करता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाचे काम झाल्यानंतर लगेच महालेखाकार, मुंबई यांचेकडील आक्षेपांचीही पुर्तता करुन ते पडताळणीसाठी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था याच महिन्यात (जून-2022) करावी. त्याबरोबरच महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरीक्षक यांचेही आक्षेपाची पुर्तता करुन संबंधिताकडून परिच्छेद वगळुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

याकामी विभागाने उचित कारवाई न केल्यास संबंधिताविरुध्द प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल व त्यांचे गोपनिय अहवालात नोंद घेण्यात येईल.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका